मच्छिंद्रनाथ माळी

# कबूली वसूली



# कबूली - वसूली

मच्छिंद्रनाथ माळी

# कबूली - वसूली (kabooli - vasooli)

कथा

लेखक : मच्छिंद्रनाथ माळी

शिवकृपा निवास. कोमलनगर, पडेगांव , औरंगाबाद.

Email :- mali.machhindranath@gmail.com

Ph : 91-9823615747

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून
पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर
करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Teen Hath Naka, Thane

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या कथांतील

सर्व पात्रे,

प्रसंग आणि स्थळे

पूर्णतः काल्पनिक आहेत.

कोणाही व्यक्तीशी व प्रत्यक्ष घटनेशी साधर्म्य आढळल्यास

तो योगायोग समजावा.

# कथा-अनुक्रम

कबूली

वसूली

# “ कबूली ”

पंधरा सोळा वर्षाअगोदरचा काळ. देवगांव व परिसरातील गांवामधले पोळा ,गौरीगणपती, दिवाळी असे सण देवगांवीच्या गंगाधर कुंभाराच्या मातीचे बैल, पणत्याबोळकी अन् गणेशमुर्ती याशिवाय साजरेच होत नसत. पंचक्रोशीत कोणाचं लग्न असो लग्नाच्या बोहल्याची गाडगी अन् पंगतीत पाणी प्यायची लोटकी घेऊन न सांगता गंगा हजर होई. इतकच काय पण गंगाच्या मडक्याशिवाय मर्तिकाला अग्नी मिळत नसे. कडक ऊन्हाळयात तहानेने लोकांच्या घश्याला पडलेली  कोरड फ्रीजच्या पाण्याची बरोबरी करणाऱ्या गंगाच्या घागरी रांजणातील थंडगार पाणी पिऊनच शांत होई. ही सरबराइ करता करता गंगाचा दिवस कुठं जायचा हे कळायचच नाही. बऱ्याचदा नवऱ्याची तारांबळ पाहुन भागुबाई मदतीला धाऊन यायची.

दोघा नवरा बायकोला ‘पांडुरंगाच्या भक्तीचा’ मोठा छंद. वाडवडीलाकडूनच ही ‘भक्तिरसामृत गंगा’ गंगाच्या पदरात पडली होती. ही भक्तीगंगा गंगाकडून कधी कमी झाली नाही

की कधी ओसरली नाही उलट वाढतच गेली. आषाढी कार्तिकीची पंढरीची पायी वारी, दिंडी त्याची कधीही टळली नव्हती. एकदा दोनदा तर भागुबाई त्याच्यासोबत दिंडीमध्ये गेली होती. 'एकतारीवर भजन' म्हणण्याचा वारसा तर गंगाला वडीलाकडूनच मिळाला होता. एकतारी भजनात तर गंगाचा हात धरणारा परिसरात कोणी नव्हता. त्याची सुमधुर आणि सुश्राव्य भजनं ऐकून तर ऐकणारा मंत्रमुग्धच होऊन जायचा. दिंडीतही मुक्कामाच्या ठिकाणी गंगाच्या होणाऱ्या एकतारी भजनातही वारकरी दंग होउन जायचे, तल्लीन व्हायचे.

एव्हढया कष्टांच आणि प्रकांड भक्तिचं फल देतांनाही देवाने मुळीच हात आखडता घेतला नव्हता. गंगाचं घर सुख समृध्दीनं अगदी भरलेलं होतं. 'हातानं काम आणि मुखानं हरिनाम'हे तत्व गंगाच्या अंगी पुरतं मुरलं होतं म्हणुनच गंगाच्यां जीवनात दुःख ऊरलं नव्हतं. आपल्याच तंद्रीत तोंडानं सतत संत नामदेव, ज्ञानदेव, तुकारामाचे भक्तिप्रचुर भावपुर्ण अभंग गुणगुणत असायचा. गंगा परमार्थाविषयी बोलु लागल्यावर तो लोकांना सांगायचा "माणसानं प्रपंचात रहावं पण त्यात गुंतू नये. पाण्यात राहुनही कमलपत्र जसं लिप्त होत नाही तसं माणसाने संसारात वागावं. प्रपंच करायचा नसतो तो आपोआप होतो अन् परमार्थ करावा लागतो. याचं संत तुकाराम हे ज्वलंत उदाहरण आहे. ज्याने प्रपंचात राहुन परमार्थ साधला त्याचा प्रपंच सुफळ झालाच म्हणुन समजा. भवसागरातुन त्याची नौका पैलतीरी जाईलच जाईल यात तीळमात्र शंका नाही. 'मुखी हरी हरी उच्चारण, तया कैचे जन्म मरण १ कळीकाळाचे तया भय नाही, ऐसी संत देती ग्वाही. ' असं भावपुर्ण वाणीत बोलुन ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध करून टाकी. एखादा नाठाळ नास्तिक जर त्याला म्हणाला 'ह्या जगात देवच नाही' तर त्याला ' जगामाजी नसता देव, सांगा

कैसे जगते जीव १ प्राणीया प्राण. चारा पाणी . निर्मियेले एका चक्रपाणि' असे सांगुन निरूत्तर करी. " अशा भक्तीमय रंगात गंगाचं जीवन रंगून गेलं होतं.

गंगाचं हे विठ्ठल भक्तीचं वेड दिवसेंदिवस वाढतच होती. संसाराची ओढ त्याला कधी फारशी नव्हतीच. पांडुरंगाच्या कृपा प्रसादाने 'गंगा भागा' पोटी एक पुत्ररत्नही जन्माला आलं होतं 'बाळकृष्ण' नावाने वाढत होतं. घरातल्या ह्या भक्तीमय वातावरणाचा आणि आई वडीलांच्या सात्वीकवृत्तीचा प्रभाव बाळकृष्णावर झाल्यावाचुन कसा राहिल १ 'ईश्वरभक्तीचं बाळकडूच' त्याला गंगाकडून बाळपणापासूनच मिळालं होतं. 'कुंभार वैसा लोटा. और बाप जैसा बेटा' या नीतीतत्वानुसार बाळकृष्णाला 'महान किर्तनकार' करावं असं गंगाचं स्वप्न होतं ते हळुहळु सत्यात उतरत होतं. आठनऊ वर्षाच्या वयातच बाळकृष्ण भजन गायनात इतका पारंगत झाला होता की पहातच रहावं. सुरेल मधुर आवाजाची तर ईश्वरदत्त देणगीच त्याला मिळाली होती. त्याचं शिक्षणाचं अंगही चांगलं होतं. वयाच्या सोळाव्या वर्षी बाळकृष्ण बोर्डात पाचव्या नंबरने शालांत परिक्षा उत्तीर्ण झाला अन् गंगाने त्याला अध्यात्मिक शिक्षण घेण्यासाठी 'आळंदीच्या किर्तनशाळेत' घातले होते.

बाळकृष्णाचं वैदिक विद्यार्जन आणि शास्त्रीय गायनाचं . किर्तनाचं शिक्षण जोरात चालु होतं. हुषारीच्या बाबतीत 'शिक्षण संस्थेत' सर्वांच्या तोंडी बाळकृष्णाचं नांव होतं. आता बाळकृष्ण ज्ञानेश्वरीवर छानपैकी प्रवचने करू लागला. ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या एक एका ओवीवर दोन दोन तास प्रवचनं झाडू लागला. आठवडयातुन दोनदा किर्तनंही करू लागला. किर्तन

करतांना त्याला ठरवुन दिलेल्या वेळा नेहमीच कमी पडू लागल्या. किर्तनात त्याच्या मुखातुन श्रीहरिगुणवर्णनपर ज्ञानामृतवाणी बाहेर पडू लागली म्हणजे श्रोत्रावृंद हुऽऽ की चू न करता जागेवरच खिळुन बसायचा. प्रत्येक किर्तनानंतर तेथिल गुरूजनांचा शाबासकीचा हात त्याच्या पाठीवरून फिरल्याशिवाय रहात नसे. सर्वजण एकमुखाने त्याच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव करायचे.

एका तुकाराम बीजेच्या महोत्सवानिमित्त किर्तनशाळेने बाळकृष्णाचे किर्तन आयोजित केले होते.

बाळकृष्णानेही संत शिरोमणी श्री तुकाराम महाराजांच्या...

“राम म्हणे वाट चाली । यज्ञ पाऊला पाऊली ।।

धन्य धन्य ते शरीर । तीर्थ व्रतांचे माहेर ।।

राम म्हणे करिता धंदा । सुख समाधी त्या सदा ।।

राम म्हणे भोगी त्यागी । कर्म न लिपे त्या अंगी ।।

राम म्हणे ग्रासोग्रासी । तोचि जेविला उपवासी ।।

ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे तो जीवन्मुक्त ।।" या अभंगावर ईतक्या विव्दत्तापुर्ण आणि सखोल ज्ञानप्रचुर रसाळ वाणीत निरूपण केले की त्याचा हा व्यासंग पाहुन संस्था चालक आदरणीय प. पू. मामासाहेब थक्क झाले. किर्तन संपताच व्यासपीठावर जाउन त्यांनी बाळकृष्णाला शाबासकी देत मायेने त्याच्या पाठीवरून हात फिरविला. बाळकृष्णासारखे 'हिरे आपल्या तालमीत तयार होत आहेत' हे पाहुन त्यांना धन्यता वाटली आणि त्या दिवसापासून त्यांनी त्याला "शास्त्री" ही उपाधि दिली अन् 'बाळकृष्णा' चा 'बाळशास्त्री' झाला.

दोन महिन्यात बाळशास्त्री आपलं ज्ञानार्जन संपवुन स्वगृही परतणार होता. आताशा गावाकडे परिस्थीती बरीच बदलत होती. खेडया पाडयात शहरीकरणाचं वारं सुटलं होतं. वैज्ञानिक यांत्रिक युगाची सुरवात होउन लोकांना आधुनिक तंत्रज्ञान व प्रगतीची चाहुल लागली अन् अकरा बलुत्यांच्या पोटापाण्याच्या धंदयावर झपाटयाने आक्रमण झालं. मग या गोष्टीला गंगा तरी कसा अपवाद राहिल१ त्याचीही कांही कामं बंद पडली होती. आता गंगाचा हरिभक्तीकडं जास्तच कल वाढला होता.

आषाढी एकादशी चार दिवसावर आली होती. माऊलीच्या दिंडीत जायची गंगाची तयारी झाली होती. पावसाळी वातावर रोगराईला पोषक बनलं होतं. अशात भागुबाई तापाने फणफणून अंथरूणात पडली होती. गंगाची मनस्थिती व्दिधा झाली. तो चिंतागती होउन भागुबाईजवळ बसला होता. त्याला असं बसलेलं पाहुन धीर देत ती 'अहो तुम्ही काही चिंता करू

नका.बिनघोरी पंढरीला जा. डॉक्टराने आता दवा पाणी दिलंय ना१ बरं वाटल आता मला. सारी पांडुरंगाची कृपा आहे. तो सारं काही नीट करीन बघा. तुम्ही खुशाल जा. 'अन् गंगा पंढरीच्या वारीला दिंडीत गेला.

एकादशीला पहाटेच विठ्ठलरखुमाईच्या पाया पडला अन् इकडे घरी भागाईनं इहलोक सोडला. ताबडतोब गंगामाउली पंढरपुरहुन अन् बाळशास्त्री आळंदीहुन परतले. भागाबाईच सारं क्रिया कर्म पार पडलं. अपुर्ण कार्य पुर्ततेसाठी बाळशास्त्री आळंदीला परतले. गंगामाउलीही पत्नी शोकातुन सावरले अन हरिनाम चिंतनात पुर्णवेळ रममाण होऊ लागले.

लवकरच बाळशास्त्री 'वेदांत वाचस्पती' 'गायनाचार्य ' 'तर्कतीर्थ'अशा असतील नसतील त्या उपाधि संपन्न करून. 'वेदांत अन् सांप्रदायिक' किर्तनकलेत प्राविण्य संपादन करून स्वग्रामी परतले. परिसरातील गावातून बाळशास्त्रींची कथा.किर्तने आयोजित होउ लागली. बाळशास्त्रीनेही आपल्या विव्दत्ताप्रचुर मधुर आणि खणखणीत रसाळ वाणीत पवित्र ज्ञानदानाचे कार्य जोमाने सुरू केले. दोन चार वेळेला गंगामाउलीने किर्तने.प्रवचने ऐकली अन् त्याला धन्यता वाटु लागली. 'बापसे बेटा सवाई 'बनल्याचं पाहुन आपलं जीवन कृतार्थ झाल्याचं पटलं. त्याचं अंतःकरण समाधानाने भरून आलं. अल्पावधीतच बाळशास्त्रीची ख्याति दुरवर पसरली. बाळशास्त्रीला प्रपंचात फारसा रस नव्हता तरी गंगामाउलीच्या ईच्छेखातर ते एका शुभमुहूर्तावर 'शांता'शी विवाहबध्द झाले. अन् खऱ्या अर्थानं त्यांच्या घरात 'शांतीपर्व'नांदायला आलं. शांता नावाप्रमाणं स्वभावानं जणू 'शांतिब्रम्हच'होती. सत्वगुणी शांताचं 'योगविद्ये'वर फार

मोठ प्रभुत्व होतं. सौंदर्याची तर विधात्यानं शांतावर मुक्तहस्ते उधळण केली होती. पातंजली योगसुत्र तर तिच्या मुखोद्गत होतं. तीला 'समाधी लवणे . कुंडलीनी जागृत करणे' हयाही कला अंगभूत हात्या. कुणालाही भुरळ पडावी असं शरीरसौष्ठव होतं तीचं.

गंगा माउली तर आता भवजालातून जवळ जवळ चिंतामुक्तच झाली होती. पंढरपुरच्या एकादशी वाऱ्या चालु होत्या. अन् एका एकादशीला गंगा माउलीने चंद्रभागेत 'जलसमाधी' घेउन पंढरपुरातच देह ठेवला.

बाळशास्त्रीचं किर्तन प्रवचनाव्दारे ज्ञानदान अन समाज प्रबोधनाचं कार्य जोरात सुरू झालं होतं. बाळशास्त्रीचा पेहराव म्हणजे जणु 'प्रति तुकाराम' च. किर्तनप्रवचनाला बाहेर गावी जातांना ते बहुधा पायीच जायचे यायचे. कधी बरोबर कोणी असायचे कधी नसायचे. रस्त्याने मुखाने हरिभजन चालु असायचे. रात्री अपरात्री ते निर्भयपणे वावरायचे. एखादयाने 'स्वामीजी आपणास भय नाही वाटत का? तर ते त्यास उलट विचारीत "समर्थाच्या सेवका वक्रदृष्टी पाहे . ऐसा भुमंडळी कोण आहे'. ते बाहेर जास्त वेळ अन घरी कमी वेळ असायचे. शांताही घरात तासन तास समाधी लावुन असायची. योगसाधनेत रममाण असायची. एकदा आसन लावले म्हणजे तीला भोवतालच्या विश्वाचं भान नसायच. आता तर दोघ पतीपत्नी योगमार्गे एकमेकांची अंतरीचे भाव भावना जाणून घ्यायचे हे लोकांना कुठ ठाऊक होतं. देवावर पुर्ण विश्वास असलेल्या बाळशास्त्रीनां शांताच्या रक्षणाची मुळीच चिंता नव्हती. 'देव तारी त्याला कोण मारी ?'हे त्यांना कोणी समजावुन सांगण्याची गरज नव्हती.

‘ऊडदा माजी काळे गोरे’या न्यायाने देवगांवी सज्जन मंडळी असली तरी चारदोन बदफैली चालीची माणसं होती. त्यांनी ‘शांताचा राग रंग’ पाहुन ओळखुन बहुतेक जण तीच्या नादाला लागायच्या भानगडीत कोणी पडला नाही. पण दौलतीच्या आणि सत्तेच्या धुंदीत उन्मत्त सरपंच सर्जेरावाला शांताचं खरं रूप दिसलंच नाही. त्याला तीच्या बाह्य रूपाच्या मोहानं अंध केलं होतं. सर्जेरावाचा सर्व पुर्व ईतिहास जाणून असलेली त्याची पत्नी ‘सुगंधा’ त्याच्यावर ध्यान ठेवुन सतत आवर घालायचा ती प्रयत्न करी पण तो तीला नेहमी जोपारून लावायचा. त्याने तीला आपल्या गैरवर्तनाची ‘कबूली’ कधी दिलीच नाही. तो तीला जुमानत नसे.

यावेळी मात्र तिला ‘ताकास तुर न लागेल’ अशा खबरदारीने त्याच्या हालचाली होत्या. बाळशास्त्रींच्या अनुपस्थितीत घरी जाउन शांता बरोबर तुटपुंज्या बुध्दीमत्तेनुसार अध्यात्मिक प्रश्न विचारून त्याने आपली ‘मुमूक्षुची भूमिका’ छान वठवली. शांतालाही वाटलं खरच ‘जिज्ञासु’ माणूस आहे हा. अन् बाळशास्त्री कोणत्या दिवशी किर्तनाला काठे जाणार कधी जाणार याची आधीच बित्तंबात माहिती घेउन एके दिवशी सर्जेरावाने शांताला भेटून सांगितलं ‘आज रात्री येतो बरं का आम्ही शंका निरसनाला’. त्यावर शांतानेही हसुन सांगितल ‘या कधीही’.

तिनं त्याचं अंतर्मन जाणलं नव्हतं असं नाही तर पापी हेतुनं आपल्या अंगाला कोणी स्पर्शही करू शकत नव्हते याची पुर्ण तीला पूर्ण खात्री होती. किर्तनात बाळशास्त्री रामायणातील ‘अहिल्योध्दार आख्यान’ रंगवून सांगत होते. गौतम ऋषिंच्या आश्रमात इंद्राने

त्यांच्या अनुपस्थितीत लपत छपत येउन प्रवेश केला अन इकडे अकरा वाजता अंधारात मांजरपावलाने सर्जेराव बाळशास्त्रींच्या घरात शिरला. दार नुसतं लोटलेलं होतं हा तर सर्जेरावाला शुभ संकेतच वाटला. घरात गडद अंधार दाटला होता. डोळयाला काही म्हणता काही दिसत नव्हते. सर्जेरावाने खिश्यातला मोबाईल काढुन उजेड केला अन शांता पलंगावर त्याला निद्रीतावस्थेमध्ये दिसली. त्याला ही सुवर्णसंधीच वाटली. त्याने मुद्दाम तिच्यासाठी आणलेली सुवर्णमुद्रा तीच्या बोटात तीला न कळत घालावी म्हणुन तीचा हात धरला तर तीच्या हाताच्या थंडगार स्पर्षाने तो तर सर्दच झाला. त्या भांबावल्या अवस्थेतही त्याने तीच्या नाकाजवळ बोट धरल तर तीचा श्वासोश्वास बंद होता. ती शांता नसुन 'तीचं प्रेत'च असल्याचं त्याची खात्रीच झाली. त्याला कुठं माहित होतं. 'तीनं अर्ध्या तासापूर्वी शवासन लावलं होतं. सर्जेराव एकदम घामाघुम झाला. भितीनं हडबडून गेला. घाबरलेल्या सर्जेराव लंचाडात अडकायच्या भित्तीनं घाइने तिथुन सटकण्यासाठी मागे वळला तर सोन्यासारखा पिवळा धमक नाग फणा काढून फुत्कार टाकीत होता. त्याच्या फण्यावरचा मणि चमचमत होता. आता तर सर्जेरावची भंबेरीच उडाली. मोबाइल केव्हाच गळून पडला अन सर्जेराव बेभानपणे सटकला थोडयाच अंतरावर ठेचकाळून बेशुध्द पडला.

थोडया वेळात किर्तन संपवून बाळशास्त्रींना आणुन सोडायला आलेल्या जीपच्या उजेडात सर्जेराव दिसला. बाळशास्त्रींच संत ह्यदय कळवळलं त्यांनी त्याला जीपमध्ये टाकलं अन दवाखान्यात नेले. डॉक्टरी ईलाज होऊन शुध्दीवर आल्यावर सर्जेरावाला घरी सोडल्यावर जीप

निघुन गेली अन बाळशास्त्री एकटेच घरी आले. वातावरण एकदम शांततामय होतं. थोडयाच वेळात बाळशास्त्री निद्राधीन झाले.

सकाळी उठल्यावर शांताला ती सुवर्ण अंगठी अन बाळशास्त्रींना मोबाइल एकाच वेळी सापडले. बाळशास्त्रीनी काय घडलं असावं हे मनोमन जाणलं. स्नानवगैरे आटोपुन त्या वस्तु घेउन ते सर्जेरावच्या घरी आले. सर्जेराव आता पुर्ण शुध्दीवर आला होता. त्याच्या डोळयासमोर रात्री घडलेलं “भय नाटय” उभं राहीलं तशात बाळशास्त्री समोर दिसल्यावर तर तो अर्धमेला झाला. त्याच्या तोंडून शब्द निघेना. अन त्याने बाळशास्त्रींचे पायच धरले अन ‘महाराज मी पापी आहे. मला क्षमा करा’ म्हणत स्वतःच ‘रात्रीचा सारा पाढा’ वाचून कबूली देत होता. सुगंधा आश्चर्यचकीत होउन पहात. ऐकत होती. अन् बाळशास्त्री म्हणत होते “अहो . सर्जेराव मी ह्या तुमच्या वस्तू परत करायला आलो आहे. त्या घ्या अन मला बंधनातुन मुक्त करा”असं म्हणत हात जोडले. अन संताचं उदार अन् विशाल अंतःकरण पाहुन सर्जेरावला ओशाळल्यागत झालं होतं अन सुगंधा बाळशास्त्रींचे पाया पडत छद्मीपणाने म्हणत होती... “बरं झालं महाराज. एका माणसाला चांगली अद्दल घडली. पापाची मला कबूली देत नव्हतं.

अन खुष होउन गालातले गालात हसत होती..............

“ व सु ली”

किशोरावस्था संपून बाळ घडामोडे युवावस्थेत आला तरी बरेचदा त्याचं शैशवी वर्तन बघुन त्याचे पिताश्री गोंधळून जायचे. त्याची 'बालबुध्दी' संपत नसल्याची खात्री वाटुन आपणास कुठून याचं नाव 'बाळ' असं ठेवण्याची दुर्बुध्दी झाली म्हणुन मनातल्या मनात खंत करीत. बालपणी संवगड्यांनी जमवुन आणलेले 'बेत' मोडून काढण्यात बाळचा हात खंडा होता. मुलांनी बनविलेले वाळु.मातीचे किल्ले मोडायचा तर कधी मोडलेले किल्ले पुन्हा घडवायचा. या ना त्या कारणाने अट्टाहास करून आपलं कुलनाम तो सार्थ करी. इतकंच कशाला. खुद्द जन्मदात्या बापानं किसनरावांनी नव्यान्नव वेळा त्याचा जुळवून आणलेला विवाह संबंध त्याने मोडून शंभराव्यांदा मोडू पहाणारा संबंध त्यानं जोडला. अन् आपल्या 'घडामोडे'या कुलनामाची प्रत्यक्ष अनुभूति सर्वांना दाखवुन दिली होती.

वयाची तिशी ओलांडून एकतिशीत पदार्पण करताच प्रचंड उलथा पालथ करून कारकुनी पेशा संपुष्टात आणला व 'मंडळ निरिक्षक' पदग्रहण करून वडगांव बॅंक शाखेत हजर होऊन बाळ घडामोडेचा खऱ्या अर्थानं 'बाळासाहेब' घडामोडे बनला होता. तब्बल अकरा वर्ष जिल्हयाच्या ठिकाणी कारकुनाची नोकरी केल्यावर बढतीवर 'मंडळ निरिक्षक' म्हणुन बॅंकेच्या वडगांव शाखेत हजर होउन बाळ घडामोडेला उणेपुरे चोवीस होत नाही तोच 'जाहिरातीचा कागद' भिंतीवर चिकटवावा तसा दामु शिपायाने त्याच्या हातात कर्ज वसुलीचा प्रिन्टेड आदेश टेकवला. बाळ घडामोडेने त्या आदेशावरून अलगदपणे आपली स्वप्नाळू नजर फिरविली. अन् तो एकदम गोंधळुन गेला. थाऱ्यावर नसलेलं त्याचं मन वाऱ्यावर उडालं. काय करावं १ कसं करावं१ या विचारानं तो हादरून गेला. पण दुसऱ्याच क्षणी तो कसाबसा सावरला अन् मनाची तयारी करून आदेश घेउन तयारीने पळशीच्या वाटेला लागला.

दुपारचे दोन वाजले. सुर्य माथ्यावरून किचिंत कलला होता. भर ऊन्हात बाळ पायी निघाला. डोक्यात विचारांचं तुफान वादळ उठलं होतं. पायाखालुन वाट मागं मागं सरकत होती. डोक्यात विचाराचा किडा करकरत होता. तो आपल्याच नादात चालत होता. चेहरा घामाने डबडबला होता. पाय भरभर अंतर काटीत होते अन् मन मात्र भुतकालीन स्मृति छाटीत होते. आता त्याला बराच थकवा आला होता

.घश्याला चांगलीच कोरड पडली होती. आणि तरीही आपल्याच तंद्रीत त्याचे पाय यंत्रागत अंतर कापीत होते.

इतक्यात अनपेक्षितपणे कोणीतरी हांक मारल्याचा आवाज त्याच्या कानात शिरला अन् तो भानावर आला. त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले. डेरेदार आम्रवृक्षाच्या घनगर्द सावलीत एक वृध्द दिसला. नकळत त्याचे पाय तिकडे वळले. तसा तो वृध्द अदबीने बोलला...... 'राम राम पाव्हणं. कंच्या गावचं म्हणायचं आपुन ? अन् कुठीसा जायाचं म्हणाव आपनास्नी एव्हढया ऊन्हात ?' थंडगार सावलीत विसावलेल्या म्हातार्‍याने बाळवर जणू काही प्रश्नांची सरबत्तीच सुरू केली. तसे आंब्याच्या घनदाट. थंडगार सावलीत त्याचे पाय आपोआप स्थिरावले. बाळ खिश्यातील हातरूमाल काढुन कपाळावरील पुसत उभा होता तोच म्हातार्‍याने त्याच्या खांद्यावरचं पटकुर खाली अंथरीत अनोख्या आदराने बाळकडे पहात म्हणू लागला... 'याऽऽया सायब बसा. वाइच सावलीला.' तसा बाळ हाऽऽश हुऽऽश करीत आढेवेढे न घेता हातातली बॅग खाली ठेवित पटकुरावर तो बसला. त्या थंडगार छायेत त्याला एकदम सुखावल्यासारखे वाटु लागले. म्हातार्‍याने दिलेले घागरीतले शितळ पाणी प्यायल्यावर त्याला अतिशय उल्हासित वाटु लागले. तसं म्हातारा "कंच्या खात्यातलं साहेब म्हणायचं आपुन ?" उत्सुकतपोटी चौकसपणे विचारू लागला. म्हातार्‍याचा बोलघेवडा स्वभाव पदोपदी जाणवत होता. आतापर्यंत स्तब्ध असलेल्या बाळने

म्हातार्‍याच्या बोलण्याची दखल घेत ‘मी वडगांव बॅंक शाखेचा कर्ज वसुली इन्स्पेक्टर’ असा अल्पसा परिचय देऊन ‘आपण कोणत्या गांवचे आहात बाबा १’ म्हातार्‍याला प्रतिप्रश्न केला. तसा म्हादबा म्हातारा पुटपूटला ‘पळशीचा हाय म्या. काओ सायब १’ म्हातार्‍याला जनु काही प्रश्नात बोलायची सवयच होती. बाळला जरा हायसं वाटलं. काळजीच्या सुरातच त्यानं विचारलं ‘धोंडीबा मिसाळ भेटल का गावात १’तसं म्हातारा नकारार्थी मान हलवितच म्हणाला. ‘आता हया येळी नसल काय बा तो घरी. खेडयावर गेला असला तर१’

धोंडी तेल्याचं नांव कानी पडताच म्हातार्‍याचा सुरकुतल्या चेहर्‍यावर गांभीर्य पसरल्याचं बाळला स्पष्ट जाणवलं. निरभ्र आभाळात अचानक मळभ दाटुन यावे तसे म्हातार्‍याचे डोळे पाण्याने डबडबले. कंठ दाटून आला. एकदम गहिंवरून आलं अन् करूण स्वरात म्हातारा बोलु लागला.........

“लई साध्या अन् सरळ स्वभावाचा. प्रामाणिक मनाचा ‘देव माणुस’ हाय सायब आमचा धोंडी तेली. त्याच्यासारखा माणुसकीबाज माणुस नाही घावायचा सायब दुसरा कोनी. भोळया भाबडया धोंडूच्या नशिबी काय काय अजुन भोग वाढुन ठेवलेत देवाने काय माहीत १

अन् म्हातार्‍या तोंडून न कळत ‘धोंडूची कर्ज कहाणी’ सुरू झाली. लई गरिबीतला माणुस हाय सायब आमचा धोंडू. पण कधी कोणाच्या पडलेल्या सोन्याला सुदीक लावणार नाही सायब तो. म्हातार्‍याच्या वाक्यागणिक ‘सायब’ या शब्दानं बाळला ओशाळल्यागत व्हायचं. धोंडुचा वडीलोपार्जीत धंदा होता सायब करडी तेल इकण्याचा. घरात वडीलोपार्जीत लाकडी तेलघाणा बसविलेला. आपला तेलधंदा धोंडू इमानदारीनं करायचा. एक बैलावर त्याचा तेलघाणा चालायचा. आजुबाजुच्या पंचक्रोशीतले लोक करडी आणुन घालयचे अन् धोंडुही प्रामाणिकपणे मजुरी घेउन त्यांना शुध्द. स्वादिष्ट तेल ध्यायचा. नुसत्या चवीवरून ‘धोंडुच्या हातचं तेल’ओळखण्याची सवय लोकांना चांगलीच झाली होती. भेसळीच्या या युगातही धोंडुनं कधी आपल्या तेलात भेसळ केली नव्हती. अन् लोकही त्याच्याकडून डोळे झाकुन तेल घेउन जात होते. असं सारं मस्त चाललं होतं.

घेल्या साली सरकारने म्हणे एक इस्कीम काढली होती. लहान लहान पारंपारीक गृह उद्योग धंदयाच्या विकासाकरीता सरकारी धोरणानुसार बॅंका कर्ज देउ लागल्या. धोंडूचं एक प्वार अजुन लहान होतं. धोंडूनं हलाखीच्या परिस्थितीतबी उपवर यमुनीचं लगीन कसं बसं उरकलं होतं. सरकारच्या हया ध्येयधोरणाची चाहुल धोंडुलाही लागली अन त्याला कर्ज घेण्याचा मोह अनावर झाला.

दुसऱ्याच दिवशी धोंडू वडगावला गेला. बॅंक मॅनिजरला भेटला. सायबानंही धोंडूला सारं काही बैजवार समजून सांगितलं. इजेवर चालणारी 'तेलघाणा मशिन कर्ज फाइल' भरण्याची इनंती त्यानं मॅनेजर सायबाला केली. सायबानंही तयारी दाखवली. त्याने धोंडूला मशिन दुकानदाराकडून कोटेशन. जात प्रमाणपत्र. घराचं मालकी हक्क पत्र. पंचायतचं नाहरकत प्रमाणपत्र. तलाठयाकडून शेतकरी करडीचं पीक काढीत असल्याबाबत दाखला. ५सातबारा उतारे असं समदं आणायला सांगितलं. धोंडुनही हे कसरतीच काम पडेल तीथ पैसा देउन मोठया मुष्कीलीनं पार पाडलं फाइल कंप्लीट केली अन कर्ज मंजुरीची वाट पहाता पहाता भावी स्वप्नं मनात रंगवु लागला.

पंधरा दिवस उलटून गेले तरी बॅंकेकडून कर्ज मंजुरीचा खुलासा येइना गेला म्हणुन धोंडुच जाउन मॅनीजर सायबाला भेटला. मॅनेजर ताठूनच बोलला 'प्रत्यक्ष पाहणी केल्यावरच तुमच्या फाइलबाबत निर्णय घेतला जाइल. तसं सायबाची 'मुर्गा पार्टी 'नक्की करूनच तो घरी परतला. ठरल्याप्रमाणे बॅंकेचे मॅनेजरसाहेब एक दिवस संध्याकाळी हजर झाले अन् रात्री 'मुर्गा पार्टी आणि मद्यपाना'चा मनसोक्त स्वाद व आनंद उपभोग घेउन सकाळी 'चिरीमीरी'घेउनच परतले होते.

अन् दुसऱ्याच हप्त्यामदी धोंडूच्या घरात 'आधुनिक तेल घाणा यंत्र' फिट झालं. लाइनवर झ्याक चालायचबी. फाइल मंजुरीच्या गडबडीत त्याचा एकुलता

एक बैलही विकला गेला होता. भरीस भर सासरच्यांनी यमुनेला माहेरी आणुन सोडली. इजेच्या 'कंपलसरी   लोडशेडींग'चाही धोंडूच्या धंदयावर लइच इपरीत परिणाम झाला होता. ह्या यांत्रिक तेलाची चवही लोकांच्या पचनी पडना गेली. धोंडूची कमाई खुपच डबघाईला आली. तिसऱ्याच  महिन्यात कर्ज वसुली हप्ता सुरू झाला. धोंडू असहाय झाला. परिस्थितीनं तो गांगरून गेला. तशात ह्या पावसानंही काना डोळा केल्याने करडीच्या पीकाचेही तीन तेरा झाले धोंडूचा तेलघाणाही बंद पडला."

म्हाताऱ्या म्हादबाच्या तोंडून धोंडूची ही चित्तरकथा ऐकुन बाळ तर मंत्रमुग्ध झाला. दिवस मावळतीला गेला होता. म्हादबा अन् बाळ दोघंही गावच्या रस्त्याला लागले. आताशा रानावनात पांगलेली माणसं, गाई गुरं सारेच गावाकडे परतु लागले. चिटपाखरही आपापल्या खोपटात शिरू लागली होती. कर्ज वसुली तगादा धोंडूकडं कोणत्या शब्दात करावा याचाच विचार बाळ साऱ्या रस्त्यानं करीत होता. सांजवेळी म्हादबा अन् बाळ एका पाठोपाठ धोंडूच्या घरात शिरले. धोंडूनं मोठया अदबीनं स्वागत, चहापाणी केलं. म्हादबानं धोंडूला बाळचा परिचय देउन सारं नीट सांगितलं अन् आपल्या घराकडे निघून गेला.

रात्री धोंडूनं स्वतः माळकरी असूनही 'खमंग मुर्गा मटना'चं जेवन घालून बाळला संतुष्ट केलं होतं. बाळनंही तृप्त होत ढेकर दिला होता. धोंडू 'यमुने सायबाकडं लक्ष्य ठेव गऽऽ रातच्याला काय पाणीगीणी लागलं त दे.' असं सांगुन भजनाला निघुन गेला. यमुनेनंही बाळकडं जातीनं लक्ष्य पुरवलं होतं.

मध्यरात्री गावात कुठतरी चालु असलेल्या भजनाच्या भक्तिरसपुर्ण सुमधुर संगिताचे सुर बाळच्या कानी पडत होते अन् त्याचवेळी बाळला यमुनेच्या श्रृंगाररसाचं दर्शन घडत होतं. तिनं त्याला अलगद प्रणयक्रिडेत रमविलं होतं. रतिसुखामध्ये चिंब केलं होतं. धोंडू रात्री घरी कधी आला याची बाळला दखल नव्हती. सकाळी धोंडूकडं कर्ज वसुलीची जुजबी मागणी केली. पण धोंडू हप्ता भरणेस नादार असल्याचं जाणलं. ग्रामसेवकाकडून 'धोंडूच्या नादारी'चा सविस्तर लेखी रिपोर्ट हस्तगत करून बॅंकेत परतला होता. ग्रामसेवकाच्या रिपोर्टासोबत बाळने स्वतःचा सविस्तर रिपोर्ट मॅनेजरसाहेबासमक्ष ठेवला. साहेबांनी रिपोर्ट नजरेखालुन घातला अन काहीही न बोलता बाळकडं पाहात स्मितहास्य केलं. पण 'अंदर की बात' त्यांना तरी कोठे माहित होती. बाळ घडामोडेनं कोणाच्याही ध्यानीमनी नसलेली आगळी वेगळी ' वसुली 'केली होती म्हणुन......

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात छान वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि “वेळ” हा “घालवण्या”साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातून शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. मनावर होणारे परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भेट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत

असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहीतरी साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. विनामूल्य. हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. ज्या दहा लोकांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान